Editorial

संपादकीय :

# पहिले पाऊल

१९७५ साल. आतरराष्ट्रीय स्त्री वर्ष. या वर्षभरात अनेक परिषदा, बैठका, भाषणे, घोषणा, अग्रलेख गाजले. पुस्तिका, खास अंक, विशेषांक निघाले. स्त्रीवर्ष संपले, मागे पडले. पण जाता जाता कोणाच्याही नकळत त्याने काही बीजे पेरून ठेवली. कित्येकांची मने नांगरून ठेवली. आणि उत्सवाचे वारे संपल्यानंतरच्या शांत काळात त्या बीजांना धुमारे फुटलेले दिसू लागले आहेत. नांगरलेली मने तरारून वर आलेली आहेत. स्त्री–मुक्तीचा ध्यास घेऊन ठिकठिकाणच्या शेतमजूर स्त्रिया, कामगार स्त्रिया, पांढरपेशा स्त्रिया उभ्या राहू इच्छित आहेत. आतापर्यंत आपल्या नशिबाला बोल लावीत घरोघर अंधारात काम करणाऱ्या, कारखान्यात राबणाऱ्या, शेतात कष्ट करणाऱ्या आणि दारू पिऊन झिंगून आलेल्या नवऱ्याच्या हातचा मार खाणाऱ्या स्त्रिया आपली गाऱ्हाणी सांगायला अहमहमिकेने पुढे येत आहेत. नशिबाला बोल लावत बसण्यापेक्षा हे खडतर नशिबच बदलले पाहिजे, आणि हे नशीब बदलणे आपल्याच हातात आहे, आपणच हे बदलायचे आहे, सगळ्यांनी मिळून, एकजूट करून हेही याच स्त्रियांना हळूहळू उमगू लागले आहे.

या सर्व स्त्रियांच्या दुःखांना वाचा फोडण्यासाठी, त्यांच्या हुंकारांना शब्द देण्यासाठी, एक पत्रिका चालू करावी असे आम्हाला वाटले. नवी, निर्भय, आत्मविश्वासपूर्ण, व्यक्तिमत्वसंपन्न, झुंजार स्त्री निर्माण व्हावी असे आम्हाला वाटते. त्यासाठी खूप मोठी खडतर वाटचाल जगातील सर्वच स्त्रियांना करावी लागणार आहे. भारतातील स्त्रियाही या वाटचालीमध्ये मागे राहाणार नाहीत. या खडतर रस्त्यावरचा प्रवास एकमेकींचे हात हातात घेऊनच करावा लागेल. आम्ही 'अबला' नाही हे दाखवावे लागेल. हे बळ आम्हाला एकजुटीने मिळेल. अन्यायाविरुद्ध एकजुटीने लढूनच मिळेल. पहिली पायरी आहे एकमेकींची गाऱ्हाणी समजून घेणे. आपल्या दुःखांची जातकुळी एकच आहे हे समजून घेणे. जुन्या समजुती, रूढी, अंधश्रद्धा फेकून देणे. आपल्या भोवतालचे जग समजून घेणे. आजपर्यंत 'तुला काय



मार्च–एप्रिल १९७७
किंमत १ रुपया

कळतय, तू आपली भाकऱ्या भाज ' असे म्हणत सर्व स्त्रियांना समाजाच्या व्यव-हारातून वगळण्यात आले. आजही स्त्री शिकली, नोकरीसाठी बाहेर पडली, तरी तिला घरी येऊन फक्त भाकऱ्याच भाजायला बसावे लागते. शिकलेल्या स्त्रीच्या शिक्षणाचे कौतुक होत नाही, तिच्या सुगरणपणाचे कौतुक होते. तिच्या मनावरचे जुने संस्कार पुसून टाकले जात नाहीत. निरनिराळ्या क्षेत्रांत प्राविण्य मिळविलेल्या व मिळवत्या मूठभर स्त्रियांसुद्धा ह्या समाजात खऱ्या अर्थाने स्वतंत्र नाहीत. शेकडो वर्षे कष्ट करत आलेल्या, समाजाची संपत्ती निर्माण करण्यात भागीदारी केलेल्या कष्टकरी स्त्रियांना तर समाजाच्या कोणत्याही व्यवहारात स्थान नाही, मान नाही, संधी नाही.

ह्या कोंडीतून आपल्याला बाहेर पडायचे आहे. त्यासाठी नव्या जाणिवा रुजल्या पाहिजेत, नवे विचार फोफावले पाहिजेत. याकरता नवीन माध्यम हवे म्हणून ही वेगळ्या प्रकारची पत्रिका.

ही पत्रिका कष्ट करणाऱ्या, नोकरी करणाऱ्या, चूल आणि मूल करणाऱ्या पण त्यामधून बाहेर पडून नव्या जाणिवा घेऊन प्रत्यक्ष व्यवहार करू इच्छिणाऱ्या, सर्व स्त्रियांच्या आवाजाची चाहूल घेऊ शकणारी व्हावी अशी इच्छा आहे.

ह्या पत्रिकेत आपणा सर्वांना जाचणारे, अस्वस्थ करणारे विषय मांडा-वयाचे आहेत. पत्रिकेची जुळणी-आखणी सामुहिक प्रयत्नाने होणार आहे. पत्रि-केत लेखक–लेखिकांची नावे विशेष शास्त्रीय–तांत्रिक विषय जाणकारांनी मांडा-वयाचा झाला तरच आढळतील. एरवी सर्व लिखाण आजच्या सामाजिक प्रश्नाची बोच असणाऱ्या आणि बदलाची निकड वाटणाऱ्या निरनिराळ्या क्षेत्रांतील विद्यार्थी–विद्यार्थिनी, कामकरी, कष्टकरी स्त्रिया, गृहिणी या सर्वांनी चर्चेतून–विचार विनिमयातून शब्दांकित केलेले असेल. त्यांचा वेगळा नामनिर्देश आढळणार नाही.

या पत्रिकेचा हा पहिलाच अंक भगिनींच्या हाती देताना आम्हांला खूप आनंद होत आहे. या अंकातून आम्ही सर्व कष्ट करणाऱ्या, श्रमणाऱ्या भगिनींना आवाहन करतो की त्यांनी आम्हाला सहकार्य द्यावे. लेख वाचावेत. पत्रे पाठवावीत. सूचना कराव्या. ठिकठिकाणी स्त्रियांच्या संघटनांनी अन्याय निवारणा केलेल्या प्रयत्नांच्या हकीकती कळवाव्यात. या सर्व स्त्रियांना ही पत्रिका आपलीश वाटेल असे आमचे प्रयत्न राहतील.

## पत्रिकेची योजना

बायजाचा अंक दर दोन महिन्यातून एकदा निघेल. स्त्रियांना जाचण

निरनिराळे विषय वायजामध्ये मांडले जातील. प्रश्न तर असंख्य आहेत. स्त्रियांना रोजगार मिळण्याचा, स्त्रियांच्या बेकारीचा प्रश्न उग्र स्वरूपात उभा आहे. समान कामास समान वेतनाचा हक्क प्रस्थापित करावयाचा आहे. स्त्रियांनी समाजकारणात, आर्थिक व्यवहारात व राजकारणात स्थान मिळवावयाचे असेल तर तांत्रिक, वैज्ञानिक शिक्षणात त्यांनी मोठी मजल गाठावयास हवी. त्याचबरोबर जुन्या अनिष्ट रूढी व अंधश्रद्धा यांची मगरमिठी सोडवावयास हवी आणि शास्त्रीय विचारसरणी आत्मसात करायला हवी. समाजातील अनिष्ट चालीरीती, रूढी यांच्याशी मुकाबला करायला हवा. बालविवाह, हुंडापद्धती, लादलेली लग्ने बंद व्हायला हवी व सर्व भारतीयांना समान नागरी कायदा लागू करायला हवा.

आज स्त्रियांकडे भोगवस्तू म्हणून पाहिले जाते. त्याचाच परिपाक म्हणजे स्त्रियांवर अत्याचार केले जातात. वेश्या-व्यवसायात स्त्रिया खेचल्या जातात. जाहिराती, चित्रपट, साहित्य यांमधे स्त्रीच्या प्रतिमेचा वापर भोगवस्तू म्हणून केला जातो. स्त्रियांनाही स्वतःकडे अशा दृष्टीने पाहायचे वळण लागून रंगरंगोटी आणि वेशभूषेत त्या गुंतून राहातात. आपण एक बुद्धिमान व प्रतिभाशाली मानव आहोत याची जाणीव स्त्रियांना करून घ्यायची आहे. आपल्या श्रमशक्तीचा व बुद्धीचा विकास व्हावयास हवा आणि त्याचा उपयोग समाजाचे आणि त्याबरोबर आपलेही जीवन संपन्न होण्यासाठी व्हावयास हवा हे प्रस्थापित करण्यासाठी महान प्रयत्न करावयास हवेत. कोणत्याही तऱ्हेचे अन्याय, गुलामगिरी वा अत्याचार आपण सहन करणार नाही ह्यासाठी झुंजार प्रयत्न व्हावयास हवेत. हे अन्याय व अत्याचार आज कोणावर होत आहेत, आदिवासी स्त्रियांचे जीवन कसे आहे व कोणते प्रश्न त्यांना जाचत आहेत, दलित स्त्रिया कोंदलेले जीवन का जगत आहेत, शेतमजूर स्त्रियांच्या अखंड कष्टाच्या जीवनात का बदल होत नाही, कारखान्यात राबणाऱ्या स्त्रियांचे शोषण का होते आणि त्यातून बाहेर पडण्यासाठी त्या कशा धडपडत आहेत, घराच्या चार भिंतींच्या अंधारात दडपलेल्या स्त्रिया कोणकोणत्या प्रश्नांनी ग्रासलेल्या आहेत आणि कोणत्या नवीन वाटा शोधीत आहेत ह्या सर्वांचा शोध आपल्याला घ्यावयाचा आहे.

स्त्रियांच्या जीवनाचे सारे प्रश्न सम्यक सामाजिक जीवनातील निरनिराळ्या व्यापक समस्यांना जाऊन भिडतात त्याही प्रश्नांचा आपल्याला विचार करावयाचा आहे. देशामध्ये दारिद्र्य कां? महागाई कां? यातून मार्ग काय? कष्टकऱ्यांना घातक अशी दारू, मटका, जुगार ही व्यसने कोणत्या परिस्थितीत वाढत राहतात, त्यातून सुटका कशी करावयाची? अशा आपल्या जिव्हाळ्याच्या अनेक प्रश्नांना

आपल्याला उत्तरे शोधायची आहेत. **बायजाच्या** दर एक अंकामध्ये **एका** विषयाचा परामर्श घेण्याची योजना आहे.

## दारुबाजी–एक सामाजिक समस्या

**बायजाचा** हा पहिला अंक आम्ही **तुमच्या** हाती देत आहोत, **ह्यातील** लेखन करणारे हात आपल्याच सहकारी भगिनींचे आहेत, पण त्या हातांना **आणि** त्यांनी मांडलेल्या विचारांना प्रेरणा तुम्ही असंख्य भगिनींनी दिली आहे.

धुळे, जवळे, भोर आणि अशा महाराष्ट्रातील व भारतातील **अनेक** ठिकाणी कष्टकरी भगिनींनी "दारू" ह्या कष्टकऱ्यांच्या राशीला लागलेल्या राक्षसाचा समाचार पोडतिडिकीनें घेतला. कष्टकरी स्त्रियांचे हे प्रयत्न **डोळसपणे** टिपून त्यांचा संदेश सर्व भगिनींपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला आहे.

दारूबाजी या सामाजिक प्रश्नाचा आपण सर्व बाजूंनी अभ्यास करू या. कारण गरिबांचे संसार उध्वस्त करणाऱ्या, त्यांची विचारशक्ती आणि ताकद नष्ट **करणाऱ्या या दारूचा समाचार घेणे हा स्त्री मुक्ती चळवळीचा एक भाग आहे.**

◆◆

**वाचकांनो**,

ह्या अंकामध्ये दारूबाजी का वाढते, दारुपानाचे आरोग्यावरील घातुक परिणाम, दारुबाजीच्या विळख्यातून सुटका कशी होईल ह्या विषयांचे विवेचन केले आहे. आदिवासी समाजात – ठाणे जिल्ह्यातील नानिवली, धुळे जिल्ह्यातील दारूचा पगडा आणि त्यातून बाहेर पडण्यासाठी तेथील बायकांचा झगडा, भोरच्या स्त्रियांची दारुबाजीशी टक्कर अशी वास्तवाची चित्रे दिली आहेत. शेवटी दारुबंदीची मागणी आपण का करतो ते मांडले आहे. हे सर्व लिखाण आपण वाचावे व आपली मते आम्हास कळवावी.

निरनिराळ्या लेखात केलेल्या मुद्यांबद्दल तुमची काय प्रतिक्रिया आहे ते कळवावे, नवीन विचार मांडावे, विषयाच्या मांडणीबद्दल सूचना कराव्या. तुम्हाला कोणते लिखाण आवडले व ते का आवडले, तुम्हाला कोणत्या लेखात बदल सुचवावे वाटतात, सुधारणा सुचवाव्या वाटतात, चुका आढळतात ते सविस्तर कळवावे. आपणाकडून जितकी पत्रे येतील तितका पुढचा अंक चांगला काढण्यास आम्हाला मदत होईल. आपली पत्रे खालील पत्त्यावर पाठवावीत.

सौदामिनी राव, संपादक 'बायजा', निधी बंगला,
प्रभात रस्ता, पुणे ४.